शांतिब्रह्म
श्रीसंत एकनाथ महाराज
यांच्या परंपरेची

नित्योपासना

संपादक : ह.भ.प.डॉ.श्री.पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी

॥ श्रीगुरुदेव दत्तात्रेय जनार्दन श्रीएकनाथ ॥

श्रीभगवान प्रासादिक वारकरी सांप्रदायिक ग्रंथमाला

पुष्प ५ वे

शांतिब्रह्म श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या परंपरेची

नित्योपासना

संपादक

श्री.ह.भ.प. डॉ. पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी

१४ वे नाथ वंशज नाथ संस्थान, श्रीक्षेत्र पैठण

गीर्वाणज्योती प्रकाशन

सातारा पुणे मुंबई

१९४८ शके] प्रथमावृत्ती [२०२६ ईसवी

शांतिब्रह्म श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या परंपरेची

नित्योपासना

- **प्रथमावृत्ती** – अधिक ज्येष्ठ शुद्ध ८,शके १९४८
  शनिवार, दिनांक २३ मे २०२६

- **संपादक :** **श्री.ह.भ.प. डॉ. पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी**
  १४ वे नाथ वंशज नाथ संस्थान, श्रीक्षेत्र पैठण, संपर्क: ९४२१३००८ २१

- **प्रकाशिका :**

सौ. सुमित्रा शि. जाधव

गीर्वाणज्योती प्रकाशन,

भ्रमणध्वनी – + ९१ ९८२२० ९७५०७

ईमेल – geerwanjyotiprakashan@gmail.com

शाखा:

१.सातारा :

गीर्वाणज्योती, कारंजकरनगर, पारशी विहिरीजवळ, विलासपूर, सातारा , महाराष्ट्र – ४१५ ००१

२.पुणे :

सी ८०२, जीके रोज मॅन्शन,भारत पेट्रोल पंपाजवळ , पुनावळे, पुणे, महाराष्ट्र – ४११ ०३३

३. मुंबई :

४७, उदय को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, आरे रोड, गोरेगांव प., मुंबई, महाराष्ट्र -- ४०० १०४

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

संतसाहित्य प्रकाशन समिती

- **ह. भ. प. श्री. केदार कृष्णदास महाराज नामदास**
  संत नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज, श्रीक्षेत्र पंढरपूर
- **ह. भ. प. श्री. मुरारी मुकुंद महाराज नामदास**
  संत नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज, श्रीक्षेत्र पंढरपूर
- **ह. भ. प. श्री. पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी**
  संत एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज, नाथ संस्थान, श्रीक्षेत्र पैठण
- **ह. भ. प. श्री. मारुती महाराज निगडीकर**, सातारा
- **ह. भ. प. श्री. गुलाब बापुराव दर्शले, पुनावळे**
  (माळवाडी), ता. मुळशी, जि. पुणे

संकल्पक – संकलक

- **डॉ. शिवदास कुंडलिक जाधव**

तंत्रज्ञान सल्लागार

- **डॉ. नीलेश निशिकांत जोशी**

॥ नित्योपासना ॥

साधारणपणे वारकरी व साधक यांनी नित्योपासना या क्रमाने करावी

१) श्रीविष्णुसहस्रनाम
२) श्रीसंत माऊली ज्ञानेश्वर महाराज यांचा हरिपाठ
३) श्रीसंत एकनाथ महाराज यांचा हरिपाठ

अनुक्रमणिका

॥ श्रीकृष्णदयार्णव रचित श्रीएकनाथ महाराज दशकस्तवन ॥......................................1

॥ श्री एकनाथ महाराजकृत हरिपाठ ॥.. 3

ब्रीदावळी 17

॥ वारकरी परंपरेची नित्य संध्या ॥ 24

॥ गुरुपरंपरा अभंग ॥... 25

॥ भजन :- जनार्दन माऊली जनार्दन एकनाथ ॥ 26

॥ श्रीसंत निळोबाराय कृत आरती ॥ 27

॥ एकनाथमहाराजांची आरती ॥ 28

॥ सांगता अभंग ॥... 29

॥ श्रीकृष्णदयार्णव रचित श्रीएकनाथ महाराज दशकस्तवन ॥

अधिष्ठान जेथें प्रतिष्ठान देखा। तिथे जन्मला तो गुणातीत एका॥
जयाचेनी नामें चुके जन्म व्यथा। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥१॥

नदी दिव्य गोदातटीचा निवासी। सदा प्रिय जो सज्जना वैष्णवांसी।
जया वर्णिता प्रेम आल्हाद चित्ता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥२॥
स्वये भानु जो भानु आराधियेला। तयाची कुळीं दिपकु दिव्य झाला।
हरी भक्तिलागोनी तारी समस्ता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥३॥

चरित्रे विचित्रे पवित्रे अपारे। मुढा पामरे तारिले सुविचारे।।
जयाचे कृपेने समाधान चित्ता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥४॥
लिलाविग्रही सर्वही निर्मियेले। जिवी जिवना साधना योग्य केले।
अनन्ययुक्ती जो भक्ती जो मुक्तीदाता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥५॥
जयाची जगी कीर्त विस्तारिलीसे। जयाची नामे महादु:ख नासे।
जयाचेनी योगे घडे सर्व सत्ता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥६॥
कवि नायकु दायकु सौख्यराशी। महाज्ञानसिंधु असे नाम ज्यासी।
जयाची जगीं वर्णिता कीर्त गाता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥७॥

महासंतसाधु प्रतिष्ठानवासी। स्मरा एकनाथा पदी मुक्ती राशी।
जयाचे गृहीं कृष्णजी कार्यकर्ता। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा॥८॥

समाधीस्थ अश्वस्थ रूपें जयाला। मुढा पामरा लागी तारावयाला।

निराकार आकार होऊनी यथार्थां। नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा ॥९ ॥

एकात्मा जाणुनी भाव एका। एकादशाची करी शुद्ध टिका।

जनार्दनाचे प्रियपात्र पाही। त्या एकनाथा स्मरतो सदाही ॥१० ॥

***

॥ श्रीगुरुदेव दत्तात्रेय जनार्दन श्रीएकनाथ ॥

॥ श्री एकनाथ महाराजकृत हरिपाठ ॥

(मंगलाचरण)

॥ जय जय रामकृष्णहरि ॥

अभंग १ ला

पाहतां समचरणांची शोभा ।

अवघा जगीं विठ्ठल उभा । ।१ । ।

विठ्ठलें लावियेलें पिसे ।

जिकडे पाहे तिकडे दिसे । ।ध्रु. । ।

पाहतां पाहणिया माझारी ।

पाहते गेले पाहण्यापरी । ।३ । ।

एका जनार्दनीं एक ।

विठ्ठलचि अवघा लोक । ।४ । ।

अभंग २ रा

सुंदर तें ध्यान घेऊनि मांडीवरी ।

कौसल्यासुंदरी गीतगाय । ।१ । ।

सुंदर तें ध्यान नंदाचे अंगणी ।

गोपाळ गौळणी पाहती डोळा । ।२ । ।

सुंदर तें ध्यान चंद्रभागेतटी ।

पुंडलिकापाठी उभे असे । ।३ । ।

सुंदर तें ध्यान एका जनार्दनीं ।

जनीं वनीं मनी भरलासे । ।४ । ।

श्री एकनाथ महाराजकृत हरिपाठ

अभंग १ ला

हरिचिया दासां हरि दाही दिशा।

भावें जैसा तैसा हरि तया ॥१ ॥

हरि मुखीं गातां हरपली चिंता।

त्या नाहीं मागुतां जन्म घेणें ॥धृ. ॥

जन्म घेणें लागे वासनेच्या संगें।

तेंचि झालीं अंगे हरिरूप ॥३ ॥

हरिरूप झालें जाणणें हरपलें।

नेणणें तें गेलें हरीचें ठायीं ॥४ ॥

हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग २ रा

हरि बोला हरि बोला नाहीं तरी अबोला।

व्यर्थ गलबला करूं नका ॥१ ॥

नको नको मान नको अभिमान।

सोडी मी तूं पण तोचि सुखी ॥२ ॥

सुखी जेणें व्हावें जग निववावें।

अज्ञानी लावावें सन्मार्गासी ॥३ ॥

मार्ग जया कळे भावभक्तिबळें।

जगाचिया मेळें न दिसती ॥४ ॥

दिसती जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं।

एका जनार्दनीं ओळखिलें ॥५ ॥

अभंग ३ रा

ओळखिला हरि धन्य तो संसारीं।

मोक्ष त्याचें घरीं सिद्धिसहित ॥१ ॥

सिद्धी लावी पिसें कोण तया पुसें।

नेलें राजहंसें पाणी काय ॥२ ॥

काय तें करावें संदेहीं निर्गुण।

ज्ञानानें सगुण ओस केलें ॥३ ॥

केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें।

उपजले मेले ऐसें किती ॥४ ॥

एका जनार्दनीं नाहीं यातायाती।

सुखाची विश्रांति हरिसंगें ॥५ ॥

अभंग ४ था

जें जें दृष्टीं दिसें तें तें हरिरूप।

पूजा ध्यान जप त्यांसीं नाहीं ॥१ ॥

वैकुंठीं कैलासीं तीर्थक्षेत्रीं देव।

तयाविण ठाव रितां कोठें ॥२ ॥

वैष्णवांचें गुह्य मोक्षाचा एकांत।

अनंतासी अंत पाहतां नाहीं ॥३ ॥

आदि मध्य अंतीं अवघा हरि एक।

एकचि अनेक एक हरि ॥४ ॥

एकाकार झालें जीव शिव दोन्ही।

एका जनार्दनीं ऐसें केलें ॥५ ॥

अभंग ५ वा

नामाविण मुख सर्पाचें तें बीळ।

जिव्हा नव्हे काळसर्प आहे ॥१ ॥

वाचा नव्हे लांव जळों त्याचें जिणें ।

यातना भोगणें यमपुरीं ॥२ ॥

हरिवीण कोणी नाहीं सोडविता ।

पुत्र बंधु कांता संपत्तीचे ॥३ ॥

अंतकाळी कोणी नाहीं बा सांगाती ।

साधुचे संगतीं हरि जोडे ॥४ ॥

कोटि कुळें तारी हरि अक्षरें दोन्ही ।

एका जनार्दनीं पाठ केली ॥५ ॥

अभंग ६ वा

धन्य माय व्याली सुकृताचें फळ ।

फळ तें निर्फळ हरिवीण ॥१ ॥

वेदाचेंही बीज हरि हरि अक्षरें ।

पवित्र सोपारें हेंचि एक ॥२ ॥

योग याग व्रत नेम धर्म दान ।

नलगे साधन जपतां हरि ॥३ ॥

साधनाचें सार नाम मुखीं गातां ।

हरि हरि म्हणतां कार्यसिद्धी ॥४ ॥

नित्य मुक्त तोचि एक ब्रह्मज्ञानी ।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग ७ वा

बहुतां सुकृतीं नरदेह लाभला ।

भक्तिवीण गेला अधोगती ॥१ ॥

बाप भाग्य कैसें न सरेचि कर्म ।

न कळेंचि वर्म अरे मूढा ॥२ ॥

अनेक जन्मांचे सुकृत पदरीं ।
त्याचें मुखीं हरि पैठा होय ॥३ ॥
राव रंक हो कां उंच नीच याती ।
भक्तिवीण माती मुखीं त्याच्या ॥४ ॥
एका जनार्दनीं हरि हरि म्हणतां ।
मुक्ति सायुज्यता पाठीं लागे ॥५ ॥

अभंग ८ वा

हरिनामामृत सेवीं सावकाश ।
मोक्ष त्याचें भूस दृष्टींपुढें ॥१ ॥
नित्य नामघोष जयाचें मंदिरीं ।
तेंचि काशीपुरी तीर्थक्षेत्र ॥२ ॥
वाराणशी तीर्थक्षेत्रा नाश आहे ।
अविनाशासी पाहे नाश कैंचा ॥३ ॥
एका तासामाजीं कोटि वेळां सृष्टी । ।
होती जाती दृष्टी पाहे तोचि ॥४ ॥
एका जनार्दनीं ऐसें किती झालें ।
हरिनाम सेविलें तेंचि धन्य ॥५ ॥

अभंग ९ वा

भक्तिवीण पशू कशासीं वाढला ।
सटवीनें नेला कैसा नाहीं ॥१ ॥
काय माय गेली होती भूतापाशीं ।
हरि नयें मुखासीं अरे मूढा ॥२ ॥
पातकें करितां पुढें आहे पुसतां ।
काय उत्तर देतां होशील तूं ॥३ ॥

अनेक यातना यम करवील ।
कोण सोडवील तेथें तुजला ॥४ ॥
एका जनार्दनीं सांगतां हें तोंडें ।
आहा वाचा रडे बोलतांचि ॥५ ॥

अभंग १० वा

स्वहिताकारणें संगतीं साधूची ।
भावें भक्ति हरीची भेटी तेणें ॥१ ॥
हरि तेथें संत संत तेथें हरि ।
ऐसें वेद चारी बोलताती ॥२ ॥
ब्रह्मा डोळसातें वेदार्थ ना कळे ।
तेथें हे आंधळे व्यर्थ होती ॥३ ॥
वेदार्थाचा गोवा कन्या अभिलाष ।
वेदें नाहीं ऐसें सांगितलें ॥४ ॥
वेदाचीं हीं बीजाक्षरें हरि अक्षरे दोन्हीं ।
एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग ११ वा

सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया ।
आनंदपदीं जया म्हणती हरि ॥१ ॥
सत्पद निर्गुण चित्पद सगुण ।
सगुण निर्गुण हरिपायीं ॥२ ॥
तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी ।
गीतेमाजीं हरि बोलियेलें ॥३ ॥
हरिपद प्राप्ती भोळ्यां भाविकांसीं ।
अभिमानियांसी गर्भवास ॥४ ॥

अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिन्हीं। एका जनार्दनीं तेंचि झालें ॥५॥

अभंग १२ वा

नाकळें तें कळें कळें तें नाकळें।

वळें तें नावळें गुरुवीण ॥१॥

निर्गुणीं पावलें सगुणीं भजतां।

विकल्प धरितां जिव्हा झडें ॥२॥

बहुरूपी धरी संन्याशाचा वेष।

पाहून तयास धन देतीं ॥३॥

संन्याशाला दिलें नाहीं बहुरूपियाला।

सगुणीं भजला तेथें पावे ॥४॥

अद्वैताचा खेळ दिसे गुणागुणीं।

एका जनार्दनीं ओळखिलें ॥५॥

अभंग १३ वा

ओळखिला हरि सांठविलां पोटीं।

होता त्याची भेटी दु:ख कैंचें ॥१॥

नर अथवा नारी हो कां दुराचारी।

मुखीं गातां हरि पवित्र तो ॥२॥

पवित्र तें कुळ धन्य त्याची माय।

हरि मुखें गाय नित्य नेमें ॥३॥

काम क्रोध लोभ जयाचें अंतरीं।

नाहीं अधिकारी ऐसा येथें ॥४॥

वैष्णवांचें गुह्य काढिलें निवडूनी।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

अभंग १४ वा

हरि बोला देतां हरि बोला घेतां ।

हांसतां खेळतां हरि बोला ॥१ ॥

हरि बोला गातां हरि बोला खातां ।

सर्व कार्य करितां हरि बोला ॥२ ॥

हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं ।

देहत्यागाअंती हरि बोला ॥३ ॥

हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां ।

उठतां बैसतां हरि बोला ॥४ ॥

हरि बोला जनीं हरि बोला विजनीं ।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग १५ वा

एक तीन पांच मेळा पंचविसांचा ।

छत्तीस तत्त्वांचा मूळ हरि ॥१ ॥

कल्पना अविद्या येणें झाला जीव ।

मायोपाधि शिव बोलिलेति ॥२ ॥

जीव शिव दोन्हीं हरिरूपीं तरंग ।

सिंधु तो अभंग नेणे हरि ॥३ ॥

शुक्तीवरी रजत पाहतां डोळां दिसें ।

रज्जूंवरी भासें मिथ्या सर्प ॥४ ॥

क्षेत्र क्षेत्रज्ञातें जाणताती ज्ञानी ।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग १६ वा

कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा ।

तेणें पडे गोंवा नेणें हरि ॥१ ॥

दिधल्यावांचूनि फळप्राप्ति कैंचि ।

इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ॥२ ॥

इच्छावें तें जवळीं हरीचे चरण ।

सर्व नारायण देतो तुज ॥३ ॥

न सुटे कल्पना अभिमानाची गांठी ।

घेतां जन्म कोटी हरि कैंचा ॥४ ॥

एका जनार्दनीं सांपडली खूण ।

कल्पना अभिमान हरि झाला ॥५ ॥

अभंग १७ वा

काय नपुंसका पद्मिनीचे सोहळें ।

वांझेसी डोहाळे कैंचे होती ॥१ ॥

अंधापुढें दीप खरासीं चंदन ।

सर्पा दुग्धपान करूं नये ॥२ ॥

क्रोधी अविश्वासी त्यांसीं बोध कैंचा ।

व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ॥३ ॥

खळाची संगती उपयोगासी न ये ।

आपणा अपाय त्याचे संगें ॥४ ॥

वैष्णवीं कुपथ्य टाकिलें वाळूनी ।

एका जनार्दनीं तेंचि भलें ॥५ ॥

अभंग १८ वा

न जायेचि ताठा नित्य खटाटोप ।

मंडूकीं वटवट तैसें तें गा ॥१ ॥

प्रेमावीण भजन नाकावीण मोती ।

अर्थावीण पोथी वांचूनी काय ॥२ ॥

कुंकवा नाहीं ठाव म्हणे मी आहेव ।

भावावीण देव कैसा पावे ॥३ ॥

अनुतापावीण भाव कैसा राहे ।

अनुभवें पाहें शोधूनियां ॥४ ॥

पाहतां पाहणें गेलें तें शोधूनि ।

एका जनार्दनीं अनुभविलें ॥५ ॥

अभंग १९ वा

परिमळ गेलिया वोस फूल देठीं ।

आयुष्या शेवटीं देह तैसा ॥१ ॥

घडीघडी काळ वाट याची पाहे ।

अजूनि किती आहे अवकाश ॥२ ॥

हाचि अनुताप घेऊनि सावध ।

कांहीं तरी बोध करीं मना ॥३ ॥

एक तास उरला खट्वांगरायासी ।

भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ॥४ ॥

सांपडलां हरि तयाला साधनीं ।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग २० वा

करा रे बापांनों साधन हरीचें ।

झणीं करणीचें करूं नका ॥१ ॥

जेणें नये जन्म यमाची यातना ।

ऐसिया साधना करा कांहीं ॥२ ॥

साधनांचें सार मंत्रबीज हरि ।

आत्मतत्त्व धरी तोचि एक ॥३ ॥

कोटी कोटी यज्ञ नित्य ज्याचा नेम ।
एक हरिनाम जपतां घडें ॥४ ॥
एका जनार्दनीं न घ्यावा संशय ।
निश्चयेसीं होय हरिरूप ॥५ ॥

अभंग २१ वा

बारा सोळा जणी हरीसीं नेणती ।
म्हणोनि फिरती रात्रंदिवस ॥१ ॥
सहस्र मुखांचा वर्णितां भागला ।
हर्ष जया झाला तेणें सुखें ॥२ ॥
वेद जाणूं गेला पुढें मौनावला ।
तें गुह्य तुजला प्राप्त कैंचे ॥३ ॥
पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा ।
दास सद्गुरूचा तोचि जाणे ॥४ ॥
जाणतें नेणतें हरीचें ठिकाणीं ।
एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

अभंग २२ वा

पिंडीं देहस्थिति ब्रह्मांडीं पसारा ।
हरिवीण सारा व्यर्थ भ्रम ॥१ ॥
शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी ।
हरीसी जाणोनि हरिच झालें ॥२ ॥
यारे यारे धरूं हरिनाम तारूं ।
भवाचा सागरु भय नाहीं ॥३ ॥
साधुसंत गेलें आनंदीं राहिले ।
हरिनामें झालें कृतकृत्य ॥४ ॥

एका जनार्दनीं मांडिलें दुकान ।

देतों मोलावीण सर्व वस्तु ॥५ ॥

अभंग २३ वा

आवडीनें भावें हरिनाम घेसीं ।

तुझी चिंता त्यासीं सर्व आहें ॥१ ॥

नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा ।

पति लक्ष्मीचा जाणतसे ॥२ ॥

सकळ जीवांचा करितो सांभाळ ।

तुज मोकलील ऐसें नाहीं ॥३ ॥

जैसीं स्थिती आहे तैशापरी राहें ।

कौतुक तूं पाहें संचिताचें ॥४ ॥

एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा ।

हरिकृपें त्याचा नाश झाला ॥५ ॥

अभंग २४ वा

दुर्बळाची कन्या समर्थानें केलीं ।

अवदशा निमाली दरिद्र्याची ॥१ ॥

हरिकृपा होतां भक्तां निघतीं दोंदें ।

नाचती स्वानंदें हरिरंगीं ॥२ ॥

देव भक्त दोन्ही एकरूप झालें ।

मुळीचें संचलें जैसें तैसें ॥३ ॥

पाजळली ज्योती कापुराची वाती ।

ओंवाळीतां आरती भेद नुरे ॥४ ॥

एका जनार्दनीं कल्पेचि मुराला ।

तोचि हरि झाला ब्रह्मरूप ॥५ ॥

अभंग २५ वा

मुद्रा ती पांचवीं लाऊनियां लक्ष ।

तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥१ ॥

कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें ।

व्यापकें भरिलें तोचि हरी ॥२ ॥

कर्म उपासना ज्ञान मार्गीं झालें ।

हरिपाठीं आले सर्व मार्ग ॥३ ॥

नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय ।

हरिकृपा होय तयांवरीं ॥४ ॥

झाला हरिपाठ बोलणें येथूनीं ।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

||भजन – विठ्ठला विठ्ठला --- ||

॥ पुंडलिक वरदा हरि विठ्ठल … ॥

अभंग २६ वा

हरि हरि तुम्हीं म्हणा रे सकळ ।

तेणें मायाजाळ तुटईल ॥१ ॥

आणिक नका कांहीं गाबाळाचे भरी ।

पडों येते थोरी नागवण ॥धृ.॥

भावें तुळशीदळ पाणी जोडा हात ।

म्हणावें पतित वेळोवेळां ॥३ ॥

तुका म्हणे हा तंव कृपेचा सागर ।

नामासाठीं पार पावविल ॥४ ॥

अभंग २७ वा

हरिचिया दासां हरि दाही दिशा।

भावें जैसा तैसा हरि तया ॥१ ॥

हरि मुखीं गातां हरपली चिंता।

त्या नाहीं मागुतां जन्म घेणें ॥धृ. ॥

जन्म घेणें लागे वासनेच्या संगें।

तेंचि झालीं अंगे हरिरूप ॥३ ॥

हरिरूप झालें जाणणें हरपलें।

नेणणें तें गेलें हरीचें ठायीं ॥४ ॥

हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं।

एका जनार्दनीं हरि बोला ॥५ ॥

ब्रीदावळी

अभंग १ ला

येथुन पाहे तेथवरी ।

तंव तंव अवघा दिसे हरि ॥१ ॥

आतां जाऊनी कोठे राहू ।

जिकडे पाहें तिकडे देव ॥ध्रु.॥

गिरीं कपाटीं कंदरीं ।

जिकडे पाहें तिकडे हरि ॥३ ॥

एका बैसला निरंजनीं ।

जनार्दन जनीं वनीं ॥४ ॥

अभंग २ रा

ब्रीदावळी आपुली करी जतन ।

आलो मी शरण जनार्दना ॥१ ॥

राखे माझी लाज पतिता पतित ।

तुझा मुद्रांकित रंक एका ॥ध्रु. ॥

काम क्रोध लोभ दंभ अहंकार ।

हे देहीं अनिवार सोसवेना ॥३ ॥

आशा मनीषा माया सख्या सांगा तिन्ही ।

करिती गवसणी सदा माजी ॥४ ॥

चित्त वित्त सेना लागलीसे पाठी ।

इही जीवा साठीं केली माझ्या ॥५ ॥

जनार्दना शरण अनन्य पै एका ।

अंगडे पैं देखा खांद्यावरी ॥६ ॥

अभंग ३ रा

पुसे जनार्दन कोणाचा तू कोण ।
म्हणे मी ब्राह्मण ऋग्वेदी ॥१ ॥
हात जोडूनियां उभा दीनपणे ।
सूर्यार्घ्य देणे प्रात:काळी ॥२ ॥
कोण तुझा ग्राम आलासी कोठुन ।
कोण कोण तुज परिवार ॥३ ॥
मुळीचा मी एका लागलोसे मुळी ।
आहे वंशावळी आजाआजी ॥४ ॥
दोन्ही अतिवृद्धे आहेत पैठणी ।
मीही तेथुनी आलो असे ॥५ ॥
वय ते लहान दिससी सगुण ।
अनुतापे पूर्ण बिंबलासे ॥६ ॥
दिससे तीक्ष्ण आलासे रुसून ।
करूनी अवगुण दोहीवरी ॥७ ॥
नाही मी गुणाचा नाही अवगुणाचा ।
समसाम्य जयाचा ठाव नाही ॥८ ॥
सांगतसे वृद्धे ऐकले निर्बल ।
कोण्या गुणे केले बीज तुवा ॥९ ॥
रडती मरती होतील चुकार ।
झालासे निष्ठुर केवी तया ॥१० ॥
कोण तुझा हेत काय अपेक्षित ।
दिससी विरक्त धडधडीत ॥११ ॥
नाही उपेक्षिली जनक जननी ।
भेटी नारायणे उपदेशिले । ।१२ । ।

सहज प्रसंगी ऐकिले पुराणी ।
श्रीधरी व्याख्याने टीकाकार । ।१३ । ।
तोचि धरूनि हेतू आलो मी शरण ।
करावे उद्धरण जनार्दना ॥१४ ॥
ऐकूनी वचन कळवळला मनी ।
बाह्या पसरोनी आलिंगिला ॥१५ ॥
मस्तकावरूनी उतरिला हात ।
झाला कृपावंत जनार्दन ॥१६ ॥
नयन पुंजाळले कंठ सद्गदित ।
झालीसे तिखट रोमावळी । ।१७ । ।
चुकले पाडस कुरंगिनी सांपडे ।
सुखतेने पाडे जनार्दना ॥१८ ॥
लोभियाचे धन झाले भूमिगत ।
सापडले वित्त जीवित्वाचे ॥१९ ॥
देखोनिया घन नाचती मयूर ।
वर्षती जलधार चातकासी ॥२० ॥
घाली पायीं मिठी काही केल्या नुठी ।
स्फुंद त्याचे पोटीं न समाये ॥२१ ॥
म्हणे जनार्दन होसी योगभ्रष्ट ।
साधिले वैकुंठ प्रेमसुख ॥२२ ॥
तुझिये संगती मज परमगती ।
देखोनियां स्थिती निवालो मी ॥२३ ॥
वस्तुचा पारखी विरळा एकजनी ।
एका जनार्दनीं सरीता झाला ॥२४ ॥

अभंग ४ था

कोण याची स्थिति कोण याची मति।

कोण याची गति न कळे आम्हां ॥१ ॥

कोण याचे रूप कोण याचे स्वरूप।

भक्ति ज्ञानदीप वैराग्याचे ॥२ ॥

धन्य याची माता धन्य याचा पिता।

धन्य अवधुता भेटी दिधली ॥३ ॥

पूर्व पुण्य माझे आजि फळा आले।

दत्तात्रेये पाहिले कृपादृष्टी ॥४ ॥

आणिले उदक चरण क्षालना।

अतिथी पूजना विधी मार्ग ॥५ ॥

बोलिला बालक हा माझा अधिकार।

पाय असता शिर चालू नये ॥६ ॥

सारिले भोजन बैसोनी पंगती।

ब्रह्मकर्म स्थिती यथाविधि ॥७ ॥

करिता श्रवण नित्य ज्ञानदेवी।

श्रीधरे माधवे टीकाकार ||८ ॥

सर्व दुरितें दूर तें होय सेवा सुखी।

उबग हा चित्ती न मानुनी ॥९ ॥

प्रातःकाळी नित्य शुद्ध करी तस्त।

कफ आणि पित्त स्वीकारीत।।१०।।

बहिर्भूमि स्थळ शुद्ध करी हस्ते।

अनन्य भक्तीते अनुसरला।।११।।

देखोनी जनार्दन परम चिंतातुर।

हा पूर्ण अवतार गुरुभक्त ॥१२ ॥
ही नोहे मानवी विवेकाची मूर्ति ।
दया क्षमा शांती वसे अंगी । ।१३ । ।
विधीचा उल्लंघ न करी सर्वथा ।
भावें विनटला चित्त विश्वासिक ॥१४ ॥
यापासूनि सेवा न घ्यावी सर्वथा ।
हा परित्रीचा दाता सखा माझा ॥१५ ॥
म्हणे जनार्दन गुरुभक्तितत्पर ।
ओळंगती द्वारी ऋद्धिसिद्धि ॥१६ ॥

॥ **भजन- एका जनार्दनी...** ॥

अभंग ५ वा

सद्गुरुकृपे श्रीदत्त ओळखिला ।
हृदय डोलाऱ्यावरी बैसविला ।
अभेदपूर्ण चांदवा तेथे दिधला ।
श्रद्धाभक्तीने श्रीदत्त पूजियेला ॥१ ॥
दत्त चरणी मज लागलीसे गोडी ।
भवभयाचि तुटोनी गेली बेडी ॥ध्रु.॥
सोहं गुढी तेथे उभारिली ।
मंत्रोपदेशे देहशुद्धी केली ।
पूर्ण निवृत्तीसी निवृत्तीही झाली ।
सहज पूर्णानंदे पूर्णता केली ॥३ ॥
जिकडे पाहे तिकडे चक्रपाणी ।
बोलायासी नाही राहिलीसे वाणी ।
जनीं वनीं एकात्मता खाणी ।

एका जनार्दनीं रंगलीही वाणी ॥४ ॥

अभंग ६ वा

तारियेलें येणें श्रीगुरुनायकें ।

बोधाचिये कांसे लावूनी कौतुके ॥१ ॥

या भवसागरी जाहलासे तारु ।

परतोनि पाहे तव कैचा महापुरु ॥ध्रु.॥

वचनाचे निधाये संशय छेदिले ।

अनेकत्व मोडुनी एकत्व जोडिले ॥३ ॥

एका जनार्दनीं घेतला कडिये ।

संचला प्रपंच लावियेला थडिये ॥४ ॥

अभंग ७ वा

न सोडी रे मना गुरु जनार्दना ।

संसारबंधना सोडवी रे ॥१ ॥

संसार अजगर झोंबला विखार ।

धन्वंतरी हा थोर जनार्दन ॥ध्रु.॥

जनार्दन ऐसें माऊली परियेसे ।

बहु कष्ट सायासी जोडियेली ॥३ ॥

जनार्दन रंका तारियेला एका ।

संसारी हा सखा जनार्दन ॥४ ॥

अभंग ८ वा

आदिनारायण साराचें ते सार ।

केला उपकार ब्रह्मदेवा । ।१ । ।

ब्रह्मयाने बोध अत्रीसी पै केला ।

तो शेष लाधला दत्तात्रेये ॥ध्रु.॥

दत्तात्रेये कृपा केली जनार्दनी ।

एका जनार्दनीं परिपूर्ण ॥३ ॥

अभंग ९ वा

अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचें आतां ।

चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें ॥१ ॥
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ ।

अनाथांचा नाथ जनार्दन ॥धृ.॥
एका जनार्दनीं एकपणें उभा ।

चैतन्याची शोभा शोभतसे ॥३ ॥

******

॥ वारकरी परंपरेची नित्य संध्या ॥

झाली संध्या संदेह माझा गेला ।

आत्माराम हृदयीं प्रगटला ॥धृ. ॥

गुरुकृपा निर्मळ भागिरथी ।

शांति क्षमा यमुना सरस्वती ।

असीपदें एकत्र जेथें होतीं ।

स्वानुभव स्नान हें मुक्त स्थिति ॥२ ॥

सद्बुद्धीचें घालूनि शुद्धासन ।

वरी सद्गुरुची दया परिपूर्ण ।

शमदम विभूती चर्चुनी जाण ।

वाचे उच्चारी केशव नारायण ॥३ ॥

बोध पुत्र निर्माण झाला जेव्हां ।

ममता म्हातारी मरोनि गेली तेव्हां ।

भक्ति बहिण धांऊनि आली गांवा ।

आतां संध्या कैसी करूं केव्हां ॥४ ॥

सहज कर्मे झालीं तीं ब्रह्मार्पण ।

जन नोहे अवघा हा जनार्दन ।

ऐसें ऐकतां निवती साधुजन ।

एका जनार्दनीं बाणली निज खूण ॥५ ॥

॥ गुरुपरंपरा अभंग ॥

जो निर्गुण निराभास।

जेथून उद्भव शबल ब्रह्मास।

आदिनारायण म्हणती ज्यांस।

तो सर्वांसी आदिगुरु ॥१॥

तयाचा ब्रह्मा अनुग्रहीत।

ब्रह्मा अत्रीस उपदेशीत।

अत्रीपाद प्रसादीत। श्री

अवधूत दत्तात्रय ॥धृ.॥

दत्तात्रय परंपरा।

सहस्रार्जुन यदु दुसरा।

जनार्दन शिष्य तिसरा।

केला खरा कलियुगीं ॥३॥

जनार्दन कृपेस्तव जाण।

समूळ निरसलें भवबंधन।

एका जनार्दनीं शरण।

झाली संपूर्ण परंपरा ॥४॥

॥ भजन : - जय विठ्ठल... ॥

शरण शरण एकनाथा ।

पायी माथा ठेविला ॥१ ॥

नका पाहू गुणदोष ।

झालो दास पायांचा ॥२ ॥

उपेक्षिता मज ।

परि ही लाज कवणाशी ॥३ ॥

तुका म्हणे भागवत ।

केले श्रुत सकळा ॥४ ॥

॥ श्रीसंत निळोबाराय कृत आरती ॥

भानुदासाचें कुळीं महाविष्णुचा अवतार ।

क्षेत्र प्रतिष्ठान वस्ती गोदातीर ॥१ ॥

ओंवाळूं आरती स्वामी एकनाथा ।

तुमचें नाम घेता हरे भव भय चिंता ॥धृ. ॥

जनार्दनाची कृपा दत्तात्रयाचा प्रसाद ।

भागवती टीका नारायण आत्मबोध ॥३ ॥

ब्रह्मा विष्णु महेश ज्यासी छळावयां येती ।

न कळे ज्याची निष्ठा होय एकात्मता भक्ति ॥४ ॥

कावडीनें पाणी ज्यां घरीं चक्रपाणि वाहे ।

अनन्य भक्ति भावें निळा वंदीं त्याचें पाय ॥५ ॥

॥ एकनाथमहाराजांची आरती ॥

आरती एकनाथा । महाराजा समर्था ।

त्रिभुवनीं तूंचि थोर । सद्गुरु जगन्नाथा ॥१ ॥

एकनाथ नाम सार । वेदशास्त्रांचे गुज ।

संसार दुःख नासे । महामंत्रांचे बीज ॥२ ॥

एकनाथ नाम घेतां । सुख वाटलें चित्ता ।

अनंत गोपाळ दासा । धनी न पुरे गुण गाता ॥३ ॥

॥ सांगता अभंग ॥

पोटींचें बाळ अवगुणीं वोखटें ।

परि मायबापा स्नेहो मोठें ॥१ ॥

तयापरि उदरा आलों जी स्वामी ।

अवगुणाच्यापरी नुपेक्षा तुम्ही ॥ध्रु.॥

गुण नाहीं तेथे कर्म कैंचें धड ।

परि मायबापा वाटतसे कोड ॥३ ॥

एका जनार्दनीं उद्धव सावें ।

म्हणोनी हरिदासा कौतुक त्याचें ॥४ ॥

शेवट भजन - ॥ भानुदास एकनाथ ॥

॥ पुंडलीकवरदा हरि विठ्ठल ॥

॥ श्रीज्ञानदेव तुकाराम ॥

॥ दत्तात्रेय जनार्दन श्रीएकनाथ महाराज की जय ॥

॥ काही महत्त्वाच्या नोंदी ॥

॥ काही महत्त्वाच्या नोंदी ॥

॥ काही महत्त्वाच्या नोंदी ॥

॥ **काही महत्त्वाच्या नोंदी** ॥

ग्रंथ व हस्तलिखिते यांविषयी विनम्र आवाहन

ग्रंथ व हस्तलिखिते ही ज्ञानाचा खजिना आहेत, अनेक घरात बंदिस्त कपाटात हा दुर्मिळ खजिना धुळीत लोप पावत आहे. आम्ही आपणांस विनम्रपणे आवाहन करतो की, आपल्याकडे असलेले छापील व हस्तलिखित साहित्य, नियतकालिके, मासिके (जुनी,नवीन) 'संस्कृत ग्रंथालया'कडे जमा करावे. या ग्रंथालयाकडे संस्कृत वाङ्मय व संत साहित्य विषयक दुर्मिळ ग्रंथ जमा आहेत . अनेक अभ्यासक, संशोधक यांचा लाभ घेत आहेत. आपला बहुमूल्य ठेवा पुढच्या पिढीला ज्ञानासाठी मिळत राहील. तरी आपण सहकार्य करावे.ही विनंती.

इच्छुकांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

गीर्वाणज्योति संस्कृत ग्रंथालय,
कारंजकरनगर, पारशी विहिरीजवळ,
विलासपूर, सातारा – ४१५ ००१
(सं.क्र. ९८२२०९७५०७)
E-mail: geerwanlib@gmail.com

गीर्वाणज्योति प्रकाशन

संस्कृत नेट/ सेट परीक्षा देणाऱ्यांसाठी सुवर्ण संधी

Subject code = 25

संस्कृत NET/ JRF/ SET

online सराव प्रश्नपत्रिका

- अभ्यासक्रमातील १० ही घटकांवर प्रश्न
- प्रश्नांची पुनरावृत्ती नाही
- प्रश्नांची तात्काळ उत्तरे
- प्रगती आलेख

- प्रतिसंच= १२ प्रश्नपत्रिका = १२०० प्रश्न
- सोडवलेली प्रश्नपत्रिका अनेकदा सोडवू शकता
- मोबाईलवर देखील प्रश्नपत्रिका सोडवू शकता

Subscribe करण्यासाठी

नमुना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी

SUBSCRIPTION FEE:

प्रति संच = रु.५००/-

एकूण ३ संच= रु.१५००/-

ONLINE PAYMENT:

ACCOUNT NAME – GEERWANJYOTI

ACCOUNT NO. 037004042209195001

IFSC - CSBK0000370

BANK NAME - CATHOLIC SYRIAN BANK

BRANCH – SATARA

UPI- geerwanajyotiprakashan@oksbi

Gpay- 9822097507

geerwanajyotiprakashan@oksbi

UPI BHIM Paytm Accepted Here G Pay

संपर्क :-
गीर्वाणज्योति प्रकाशन,
पारशी विहिरीजवळ, कारंजकरनगर,
विलासपूर, सातारा, महाराष्ट्र ४१५००१
भ्रमणध्वनी ९१+ : ९८२२०९७५०७

।। शांतीब्रह्म श्रीसंत एकनाथ महाराज समाधी, श्रीक्षेत्र पैठण ।।

* ह.भ.प.डॉ.श्री.पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी
* श्री एकनाथ महाराज यांचे चौदावे वंशज,
संत एकनाथ महाराज संस्थान श्रीक्षेत्र पैठण.
* अध्यक्ष, स्वरनाथ प्रतिष्ठान,पैठण.
* संचालक,सरस्वती संगीत विद्यालय,पैठण.

* श्रीसंत एकनाथ महाराजांच्या साहित्याच्या अभ्यासाव्दारे नाथांच्या परंपरेप्रमाणे नारदीय कीर्तन व वारकरी कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, एकनाथी भागवत कथा, नाथचरित्र सकल संतचरित्र कथा आणि भजनाव्दारे समाज प्रबोधनाचे कार्य अविरत सुरु आहे.

गीर्वाणज्योती प्रकाशने

Tarot: A Royal Roadmap of Your Life Journey	Renuka Panchal
महाकविभासप्रणीतम् दूतवाक्यम्	डॉ. शिवदास कुंडलिक जाधव,डॉ. पंडित बाबुराव गायकवाड
महाकविकालिदासप्रणीतम् अभिज्ञानशाकुन्तलम् (चतुर्थोऽङ्कः)	डॉ. शिवदास कुंडलिक जाधव,डॉ. पंडित बाबुराव गायकवाड
चाणक्यनीति (चाणक्यनीतिदर्पणः)	डॉ. शिवदास कुंडलिक जाधव,डॉ. पंडित बाबुराव गायकवाड
श्रीगौतममुनिविरचित न्यायसूत्रे भाग १	Dr. Shailaja Bapat
श्रीगौतममुनिविरचित न्यायसूत्रे भाग २	Dr. Shailaja Bapat
चंपूरामायणाचा रसास्वाद	Dr. Aniruddha Mandalik
कुमारसम्भवम् पञ्चमः सर्गः (पार्वतीतपः फलोदयः)	Dr. Shivdas Jadhav
श्रीभर्तृहरिविरचितम् नीतिशतकम्	Dr. Shivdas Jadhav, Mrs. Leena Sunil Pande

गीर्वाणज्योती प्रकाशने

रसतरङ्गिणी	Dr. Nilesh Joshi
Suicide And Attempted Suicide	Dr.C.G.Deshpande
भामिनी विलास: प्रास्ताविक – अन्योक्ति – विलास:	Dr. Shivdas Jadhav
लघुसिद्धान्तकौमुदी-संज्ञाप्रकरणम्	Dr. Shivdas Jadhav
लघुसिद्धान्तकौमुदी- सन्धिप्रकरणम्	Dr. Shivdas Jadhav
लघुसिद्धान्तकौमुदी-विभक्त्यर्थ-प्रकरणम्	Dr. Shivdas Jadhav
याज्ञवल्क्यस्मृति-व्यवहाराध्याय:	Dr. Shivdas Jadhav
छात्र-संस्कृत-शब्दकोश-VOL-I	Dr. Nilesh Joshi, Dr. Shivdas Jadhav
निवडक-अप्रसिद्ध-उपनिषदे	Dr. Nilesh Joshi
सार्थ निघण्टु-कोश	Dr. Nilesh Joshi
वार्त्तिककोश:	Dr. Nilesh Joshi
संस्कृत-अध्यापन-पद्धती भाग-१	Dr. Shivdas Jadhav, Prof. Nutan Nangare-Shinde
मराठीचे संशोधन (भाषा आणि साहित्य)	Dr. Anil Gavali
Pharmaceutics Practical II	Mr Jadhav P A Dr Pawar P K Ms Kadam S S Ms Jadhav P H
The Glorious Symbols of India's UNESCO'S World Hritage	Prof Sandeep Dhikale
साहित्यदर्पण: (प्रथम: परिच्छेद:)	Dr. Shivdas Jadhav, Dr. Nilesh Joshi
SCHIZOPHRENIA	Dr.C.G.Deshpande
अथातो ब्रह्मजिज्ञासा	Dr. Shailaja Bapat
मनुस्मृति: सप्तमोऽध्याय: (राजधर्मनिरूपणम्)	Dr. Shivdas Jadhav
किरातार्जुनीयं महाकाव्यम् (प्रथम: सर्ग:)	Dr. Shivdas Jadhav, Dr. Diwakar Mohanti
रघुवंशं महाकाव्यम् (प्रथम: सर्ग:)	Dr. Shivdas Kundalik Jadhav, Dr. Shashikant Daragu
Bruhaddeshi	Dr. Nilesh Joshi Ms. Aishwarya Kadekar
Comprehensive Review of Clinical Research	Dr Sanatkumar Nyamagoud, Dr. Chandrahas Jadhav
उत्तररामचरितम् (भाग १) अंक १ ते ३	Dr. Shivdas Jadhav
प्रतिमानाटकम् (भाग १) अंक १ ते ३	Dr. Shivdas Jadhav, Dr. Mrunalini Shinde
Basic English Grammar And Composition	Prof. Ramchandra Laxman Gadekar
रघुपुंगवकीर्ति	Dr. Aniruddha Mandalik
Structure of Modern English	Prof. Ramchandra Laxman Gadekar
अद्वैत संस्कृत निबन्धमाला	Dr. Pradnya Deshpande
साठवणी	प्रा. डॉ. सोनाली भिलारे-पवार
The Medical Acts and Laws	Dr. Ranjit Dattatray Patil
व्याकरणमहाभाष्य-पस्पशाह्निकम्	Dr. Shivdas Jadhav, Dr. Nilesh Joshi
Into The Enchantment of Pixie's Lenormand	Renuka Panchal